**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- १**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २१/०४/२०११

प्रति,
मा. ---------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. १ बुधवार दि.२७/०४/२०११ रोजी दुपारी १.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.
तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये
अहमदनगर महानगरपालिका.

**बुधवार दिनांक- २७/०४/२०११ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३ बुधवार दिनांक २३/०२/२०११ रोजीच्या (अंदाजपत्रक ) व मा.स्थायी समिती सभा क्र.१४ शुक्रवार दिनांक ११/०३/२०११ रोजी सभांचे कार्यवृत्त कायम करणे. |
| २ | श्री. भगिरथ नानाजी बनकर, रा. नगर-पुणे हायवे रोड केडगांव वॉर्ड क्रमांक ३१ बील क्र.१९० यांचे संपुर्ण घर पाडलेले असल्याने सन २००७ ते २०११ अखेर एकूण रूपये ६,३५२/- ची घरपट्टी निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३ | सौ. मंगल तुषार शेळके, रा. भुषणनगर केडगांव,अ.नगर यांचे विनायक चौक, भुषणनगर वॉर्ड क्र.३९ प्लॅट नं. ब/२२ या मिळकतीची नोंद दोन ठिकाणी झालेली असल्याने सन २००४ ते २०१० अखेर घरपट्टी रूपये ३,९७२/- चे घरपट्टी बील क्रमांक १४४८ चे निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५४ मधील स्टेशन रोडवरील शिवनेरी चौक ते ते आनंदनगर पर्यत ३०० एमएम व्यासाची डी.आय. पाईप लाईन टाकणेचे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या कायम गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांकरिता गणवेष शिलाई करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास व रक्कम रूपये ४,७६,०००/-फक्तचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | अहमदनगर महानगरपालिकेचे कायम गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांकरिता गणवेष शिलाई करून वाटप करणेकरिता लागणारे कापड खरेदी करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास व रक्कम रूपये १६,२९,८४६/- चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

...२

| | |
|---|---|
| ७ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे व सुतिकागृह दवाखाना येथे डॉ.श्री.सुभाष फिरोदिया, डॉ.श्री.अनिरूध्द गिते व डॉ.श्री.सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून कंत्राटी करारानुसार दिनांक २७/१२/२०१०ते २६/६/२०११ अखेर मानधनावर केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील बोल्हेगांव दलीत वस्ती भागासाठी विद्या सागर बुक स्टॉल ते श्री. कातोरे वस्ती दरम्यान १५० व २०० एमएम डी.आय. पाईप लाईन टाकणेचे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९ | अहमदनगर महानगरपालिकेच्या जुन्या वाहनांचा लिलाव करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १० | अहमदनगर महानगरपालिकेचे डॉ. एस.टी. महाले, मंगल कार्यालय भाडेतत्वावर चालविण्यांस मिळणे बाबत शिववरद पुरूष बचत गट इतर यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ११ | अहमदनगर महानगरपालिकेचे राणी लक्ष्मीबाई चौक भूषणनगर येथील महिला जीम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणेकामी अटी शर्ती व भाडे निश्चितीस व करारनाम्याचे मसुदयास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२ | अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभाग / घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता शहरात निर्माण होणा-या कच-याचे मनपाचे वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणे करिता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे कामी मागविण्यांत आलेल्या प्राप्त निविदा मधील द्वितीय लघुत्तम निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १३ | अहमदनगर महानगरपालिकेचे १२ व्या वित्त आयोगातील निधी मधून काटवन खंडोबा रस्त्यावरील पुल व सारसनगर रस्त्यावरील भिंगार नाल्यावरील पुलाचे कामासाठी रूपये २१ लक्ष इतका निधी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील पत्रानुसार त्यांचेकडेस हस्तांतरीत करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत**-१] विषय क्र.१-मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३ बुधवार दिनांक २३/०२/२०११ रोजीच्या(अंदाजपत्रक ) व मा.स्थायी समिती सभा क्र.१४ शुक्रवार दिनांक ११/०३/२०११ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- २ ते १३ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक - १ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३ बुधवार दिनांक २३/०२/२०११ रोजीच्या (अंदाजपत्रक) व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४ शुक्रवार दिनांक ११/०३/२०११ रोजीचे सभांचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर:-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १३ बुधवार दिनांक २३/०२/२०११ रोजीच्या (अंदाजपत्रक) व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४ शुक्रवार दिनांक ११/०३/२०११ रोजीचे सभांचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा क्रमांक १३ व १४ चे सभांचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.पवार बा.रे.:- मागील सभा दिनांक २३/२/२०११ व दिनांक ११/३/२०११रोजीचे सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- मागील सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३ बुधवार दिनांक २३/०२/२०११ रोजीच्या (अंदाजपत्रक) व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४ शुक्रवार दिनांक ११/०३/२०११रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३ बुधवार दिनांक२३/०२/२०११ रोजीच्या (अंदाजपत्रक) व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४ शुक्रवार दिनांक ११/०३/२०११ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती,

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- २ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक - २ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.भगिरथ नानाजी बनकर, रा. नगर-पुणे हायवे रोड केडगाव वॉर्ड क्रमांक ३१ बील क्रमांक १९० यांचे संपुर्ण घर पाडलेले असल्याने सन २००७ ते २०११ अखेर एकूण रूपये ६,३५२/- ची घरपट्टी निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका केडगाव उपकार्यालय दि.२२/१२/२०१०

मा.सादर,

विनंती टिप्पणी सादर करण्यात येते की, श्री. भगीरथ नानाजी बनकर , रा. नगर-पुणे रोड, वॉर्ड क्र.३१ बिल क्र.१९० केडगांव देवी,अ.नगर ही मिळकत संपूर्ण जमीनदोस्त झाल्याने त्यामिळकती वरील मालमत्ता कराची कर आकारणी सन २००७-२००८ पासून सन २०१०-११ पर्यत रक्कम रूपये ६,३५२/- रद्द करण्याबाबत (निर्लेखित करण्याबाबत) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार मंजुरीसाठी सविस्तर ऑफिस रिपोर्ट ठेवून ठेवले असता. सदरचे अधिकार मा.स्थायी समितीस असल्या कारणाने मा.आयुक्त साहेब यांनी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी ठेवणेबाबत मंजुरी दिलेली आहे.

तरी श्री.बी. एन. बनकर वॉर्ड क्र.३१, बिल नं. १९० केडगांव, अ.नगर यांच्या सदर मिळकतीवरील सन २००७-११ अखेर संपूर्ण घरपट्टी (मालमत्ता कर) रक्कम रूपये ६,३५२/- निर्लेखित करण्यास सदरचा प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजुरी मिळावी ही विनंती.

येणे प्रमाणे केडगाव उपकार्यालय मुख्य लिपिक यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब:-श्री.भगिरथ नानाजी बनकर यांचे संपूर्ण घर पाडलेले असल्याने सन२००७ ते २०११अखेर एकूण रू. ६३५२/-चा घरपट्टी निर्लेखित करणेस मंजूरी मिळणेबाबत प्रस्ताव आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.ढोणे मा.सु. :- श्री. भगिरथ नानाजी बनकर यांनी त्यांची मिळकत जमिनदोस्त झाले बाबत आपले कार्यालयास केव्हा अर्ज केला आहे. सदर इमारत केव्हा जमिनदोस्त झाली आहे ती जमिनदोस्त नैसर्गीक रित्या झाली की धोकादायक होती म्हणून पाडली संबंधीतास सन २००७ ते २०११ या चार वर्षा ची मालमत्ता कराची कर आकारणी बाबत थकबाकीची नोटीस पालिकेने पाठविली आहे किंवा नाही, मनपा कर्मचारी त्यास जबाबदार नाही काय? प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार मंजूरी साठी सादर करणेत आला आहे सदरच्या नियमात स्थायी समितीला अधिकार आहे का ? याचा खुलासा करणेत यावा

मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख साहेब :- "मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ 'वसुल न होण्या जोगा कर निर्लेखित करणे' आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसुल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसुल होण्या जोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल" याप्रमाणे तरतुद आहे. त्यानुसार मा.स्थायी समिती सभे कडेस मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.सौ. ढोणे मा.स. :- अर्जदार यांनी अर्ज कधी केला आहे याची माहिती द्यावी.

केडगाव उपविभाग प्रभाग अधिकारी श्री. बुचकुल :- श्री. भगिरथ नानाजी बनकर यांनी घर पाडलेले असून घरपट्टी आकारणी कमी करणे बाबत इकडेस दिनांक १६/१२/२००८ रोजी अर्ज केला आहे. सदर अर्जानुसार जागा पहाणी करून घरपट्टी आकारणी निर्लेखित करणेस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** श्री.भगिरथ नानाजी बनकर, रा. नगर-पुणे हायवे रोड केडगाव वॉर्ड क्रमांक ३१ बील क्रमांक १९० यांचे संपुर्ण घर पाडलेले असल्याने सन २००७ ते २०११ अखेर एकूण रूपये ६,३५२/- (रूपये सहा हजार तीनशे बावन्न फक्त) ची घरपट्टी निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ३ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक- ३ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** सौ. मंगल तुषार शेळके, रा.भुषणनगर केडगाव,अ.नगर यांचे विनायकनगर चौक, भुषणनगर वॉर्ड क्र.३९ प्लॉट नं.ब/२२ या मिळकतीची नोंद दोन ठिकाणी झालेली असल्याने सन २००४ ते २०१० अखेर घरपट्टी रूपये ३,९७२/- चे घरपट्टी बील क्रमांक १४४८ चे निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका केडगाव उपविभाग जा.नं.६१ दि.१५/४/११
टिप्पणी-

विनंतीपुर्वक टिपण्णी सादर करण्यांत येते की, वॉर्ड क्र.३९ बील नं. १४४८ प्लॉट नं. ब/२२ भुषणनगर केडगांव या मिळकती वरिल ओपन प्लॉटची कर अकारणी कमी करण्याबाबत सौ. मंगल तुषार शेळके यांनी दि.४/३/२००९ रोजी अर्ज दिला आहे.

सदरच्या अर्जाप्रमाणे दि.२५/९/२००९ रोजी प्रत्यक्ष जागेवर जावुन पहाणी केली असता वॉर्ड क्र.३९ बील नं.१४४८व १४७३ विनायकनगर चौक भुषणनगर अ.नगर येथील मिळकत एकच असुन त्याची नोंद दोन ठिकाणी झाली आहे. बिल नं. १४७३ वर बांधकामाची आकारणी झाली असुन ती योग्य आहे. परंतु त्याच प्लॉटवर बिल क्र.१४४८ वर मोकळया जागेवर (प्लॉटवर) कर अकारणी झाली असुन ती आकारणी सन २००४/२०१० अखेर रक्कम रूपये ३९७२/- (अक्षरी तीन हजार नउत्रे बहात्तर रू. फक्त) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम २०(१)(क) (ड) मधील कलम १५२ नुसार निर्लेखित करण्यास मा.उपायुक्त (कर) यांनी मंजुरी दिली असुन सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर करण्यास ठेवण्यास मंजुरी दिली आहे.

तरी सदर प्रस्तावास मा.स्थायी समिती समितीची मंजुरी मिळावी ही विनंती. तथापी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे केडगाव उपकार्यालय मुख्य लिपिक यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- भुषणनगर येथील सौ. शेळके यांचे मिळकतीची नोंद दोन ठिकाणी झालेली असल्याने सन २००४ ते २०१० अखेर रूपये ३९७२ चे घरपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे. ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. पवार बा.रे.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** सौ.मंगल तुषार शेळके, रा.भुषणनगर केडगाव,अ.नगर यांचे विनायकनगर चौक, भुषणनगर वॉर्ड क्र.३९प्लॉट नं.ब/२२ या मिळकतीची नोंद दोन ठिकाणी झालेली असल्याने सन २००४ ते २०१०अखेर घरपट्टी बील क्रमांक १४४८घरपट्टी रूपये ३,९७२/-(रूपये तीन हजार नउत्रशे बहात्तर फक्त)चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिति,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ४ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक - ४ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५४ मधील स्टेशन रोडवरील शिवनेरी चौक ते आनंदनगर पर्यत ३०० एमएम व्यासाची डी.आय.पाईप लाईन टाकणेचे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग १७५१ दि.१०/३/२०११

**प्रशासकीय मंजूरीसाठी**

विषय- निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- प्र.क्र. ५४ मधील स्टेशन रोड वरील शिवनेरी चौक ते आनंदनगर पर्यत ३०० एमएम व्यासाची डि.आय. पाईप लाईन टाकणे.

मा.सादर,

उपरोक्त विषयी खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यताः मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर क्र.नपा/कार्या -६अ/४१६/२०१० दि.२०/३/१० अन्वये मंजुरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. : २०,२९,७९०/-

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. : १९,३३,१३३/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची : म.जि.प्रा. व सा.बां. वि. सन २००८-०९

५] निविदा (परिशिष्ट "ब") रक्कम रू. :- १९,३३,१३३/-

६] निविदा प्रसिध्दी तारीख : १४/१२/२०१० दै. पुण्यनगरी (तिसरी मागणी)

७] निविदा विक्री कालावधी : १५/१२/१० ते २२/१२/१० (७ दिवस)

८] निविदा स्विकारण्याची तारीख : २३/१२/२०१०

९] निविदा उघडण्याची तारीख : १०/१/२०११

१०] कामाची मुदत : १० महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. तवले तुकाराम, अहमदनगर | ३३% जादा |
| २ | श्री. ससे सुर्यभान, अहमदनगर | ३५% जादा |

वरील तक्त्याच्या अनुषंगाने श्री. तवले तुकाराम, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपक्षा ३३% जादा आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन २००८-०९ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आले होते. तथापि सन २०१०-११ ची सुधारित दरसुची उपलब्ध झाल्याने सन २०१०-११ चे दरसुचीशी तुलना केली असता सदर दर हे निविदा दरापेक्षा १६.७८ % जादा येतात.

लघुत्तम निविदाधारक श्री. तवले तुकाराम, अहमदनगर यांना वाटाघाटीसाठी दिनांक १७/२/२०११ रोजीबोलविले असता त्यामध्ये लघुत्तम निविदाधारक यांनी सदरचे काम निविदा दरापेक्षा २०% जादा दराने करणेस तयार असले बाबत दिनांक १७/२/२०११ रोजी लेखी कळविले आहे.

सदरच्या दराची सन २०१०-११ च्या दरसूचीशी तुलना केली असता सदरचे दर ५.३७% जादा येत आहे. निविदा स्वीकृतीचे अधिकार मा.स्थायी समितीस असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- स्टेशन रोड वरील शिवनेरी चौक ते आनंदनगर पर्यत ३०० एमएम व्यासाची डी.आय.पाईप लाईन टाकणेचे कामी मागविण्यात आलेले कमीचे दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- महानगरपालिकेने यु.आय.डी. एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणेची योजना मंजूर करणेत आलेली आहे. सदरच्या कामाचे वर्क ऑर्डर देवुन काम चालु झाले किंवा कसे याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी सदरच्या योजनेत संपूर्ण महानगरपालिकेतील विभागाचे काम अंतर्भूत असल्याने वरील विषयात नमुद केलेली पाईप लाईन टाकणेच्या कामाची वेगळी निविदा कशी मागविली ती मंजूर करू नये. गरीब नागरिकांचा कर रूपाने मिळालेल्या रकमेचा विनियोग चांगला व्हावा.

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे.:-सदरचे कामास मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची दिनांक २०/३/२०१० अन्वये मंजूरी प्राप्त झाले नुसार सदर कामाच्या दि.१४/१२/२०१० रोजी निविदा प्रसिध्द करण्यांत येवुन प्राप्त झालेल्या दोन निविदा दिनांक १०/१/२०११ रोजी उघडण्यांत आल्या कमीचे निविदा धारक यांना वाटाघाटीसाठी बोलावले असता कमीचे निविदा दर धारक श्री. तुकाराम तवले यांनी दिनांक १७/२/२०११ रोजी सदरचे काम निविदा दरापेक्षा २०% जादा दराने करण्यांस तयार असले बाबत लेखा कळविले असून त्याप्रमाणे कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणे साठी दिनांक १७/३/२०११ रोजी प्रस्ताव स्थायी समिती सभेकडेपाठविणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेने यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणेस मंजूरी दिले प्रमाणे मंजूर अभिकर्ता यांना कामाची वर्क ऑर्डर देण्यात आलेली असून ठेकेदाराने सदर योजनेतील पांच टाक्याचे बांधकाम सुरू केलेले असून पाईप लाईन टाकणेचे काम ही सुरू केलेले आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु. :-महानगरपालिकेचे यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत कामाचे निधीतुन या कामाचा खर्च करण्यांत येवु नये. यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजने अंतर्गत तेथे काम करू नये.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- सदरचे प्रभाग क्रमांक ५४ मधील स्टेशन रोडवरील शिवनेरी चौक ते आनंदनगर पर्यत डी.आय. पाईप लाईन टाकणेचे काम हे मा. शासनाचे निधी मधीलच असुन ही पाईप लाईन टाकणार तेथे यु.आय.डी.एम.एम. एम.टी. योजने अंतर्गत पाईप लाईन टाकली जाणार नाही.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५४ मधील स्टेशन रोडवरील शिवनेरी चौक ते आनंदनगर पर्यत ३०० एमएम व्यासाची डी.आय.पाईप लाईन टाकणेचे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दर धारक श्री. तवले तुकाराम यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या निविदा दरापेक्षा २०%(वीस टक्के ) जादाचे म्हणेजच सन २०१०-२०११ चे दरसुची नुसार ५.३७%(पांच पूर्णांक सद्वतीस शतांश टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ५ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक - ५ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या कायम गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांकरिता गणवेष शिलाई करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास व रक्कम रूपये ४,७६,०००/-फक्तचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग दि.१८/३/२०११

टिप्पणी- विषय-अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र पुरूष कर्मचा-यांकरिता गणवेष शिलाई करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रू.४,७६,०००=०० फक्तच्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

सादर,

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट की, मा.स्थायी समिती ठराव क्र.५० दि.२०/७/२०१० अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे गणवेष पात्र कायम पुरूष कर्मचारी यांना गणवेष वाटप करणे करीता गणवेष कापड खरेदी व गणवेष शिलाई करणेकामी जाहिर निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रू. १९,५९,५८७/- फक्तचे खर्चास मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र अंदाजे १३७४ पुरूष कर्मचा-यांकरीता गणवेष शिलाई करणेकामी दै. समाचार दि.०२/०१/२०११ चे अंकात, महानगरपालिका वेबसाईट www.amc.gov.in वर व नोटीस बोर्डवर जाहिर फेर टेंडर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविल्या असता मुदतीत-

१) पतंगेज सुपरस्टीच टेलर्स, अहमदनगर
२) जयहिंन्द कलेक्शन, अहमदनगर
३) मनी टेलर्स, अहमदनगर

अशा एकूण तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

निविदादराचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ ते ३ चे कापड व दर मे. पतंगेज सुपरस्टीच टेलर्स, अहमदनगर यांचे स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी आहे. त्यांना दर निगोसिएशन करिता समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित राहून त्यांनी प्रशासकीय निविदा छानणी समिती समोर अ.क्र.१ मधील ५८" पन्हा चे मॅनेला शिलाई करीता १.६० मिटर कापडाऐवजी १.४० मिटर कापड व पॅन्ट शिलाई करीता १.२० मिटर कापडाऐवजी १.१५ मिटर कापड व गणवेष शिलाई करणेकामी दिलेला दर रू. १८०/- प्रती १ गणवेष मध्ये रू.१०/- प्रती १ गणवेषामागे कमी करून रू.१७०/- फक्त मध्ये शिलाई करणेस संमती दिलेली आहे.

अ.क्र.२ मधील ८९ सें.मी. पन्हा चे मॅनेला शिलाई करीता २.५० मिटर कापडाऐवजी २.३० मिटर कापड तसेच शोल्डर फ्लॅब, पॉकेट फ्लॅब इ. सह शिलाई करीता २.४० मिटर कापड व ५८" पन्हा पॅन्ट शिलाई करीता १.२० मिटर कापडाऐवजी १.१५ मिटर कापड व गणवेष शिलाई करणेकामी दिलेला दर रू.१८०/- प्रती १ गणवेष मध्ये रू.१०/- प्रती १ गणवेषामागे कमी करून रू.१७०/- फक्त मध्ये शिलाई करणेस संमती दिलेली आहे.

अ.क्र.-३ मधील १३५ सें.मी. पन्हा चे कोट व पॅन्ट शिलाई करीता ३.४० मिटर कापडाऐवजी ३.३० मिटर कापड व अस्तर करीता २.०० मिटर कापड व गणवेष शिलाई करणेकामी दिलेला दर रू.६००/- प्रती १ गणवेष मध्ये शिलाई करणेस संमती दिलेली आहे.

निविदाकार यांनी निगोसिएशन मध्ये कमी करून दिलेले कापडाचे परिमाण व दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.९ मध्ये नमुद केलेले आहेत. पतंगेज सुपरस्टीच टेलर्स, अहमदनगर यांनी निगोसिएशन नंतर कमी करून दिलेल्या कापडामध्ये व शिलाई दरामध्ये कायम गणवेषपात्र पुरूष कर्मचा-यांना गणवेष शिलाई करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रू.४,७६,०००=०० फक्त (अक्षरी रू. चार लाख शाहात्तर हजार फक्त) खर्चास मंजूरी देणेबाबत शिफारस मा. प्रशासकीय निविदा छाननी समिती मार्फत करण्याचे ठरले आहे.

तरी पतंगेज सुपरस्टीच टेलर्स, अहमदनगर यांनी निगोसिएशन नंतर कमी करून दिलेल्या कापडामध्ये व शिलाई दरामध्ये अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र अंदाजे १३७४ पुरूष कर्मचा-यांना प्रत्येकी दोन गणवेष शिलाई करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रू. ४,७६,०००=०० फक्त (अक्षरी रू. चार लाख शाहात्तर हजार फक्त) खर्चास तसेच नामंजूर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजूरी मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर केलेला असून त्यावर मा.मुख्य लेखापरिक्षक तथा मा.मुख्य लेखाधिकारी, मा. उपायुक्त साहेब (कर) व मा.आयुक्तसाहेब यांची अभिप्रायासह स्वाक्षरी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पुरूष कर्मचा-यांना गणवेष देणेकरिता गणवेष शिलाई करणेकामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु.:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ.ढोणे मा.सु. :- गणवेष वाटप करणे कामी येणा-या खर्चास मा.स्थायी समिती सभेने मंजूरी दिले नंतर प्रस्ताव उशीरा सादर केला आहे. स्थायी समितीचे मंजूरी नंतर सहा महिने काय कार्यवाही केली.

स्टोअर विभाग प्रमुख श्री. जाधव :- महानगरपालिकेचे गणवेष पात्र पुरूष कर्मचारी यांची माहिती संबंधीत विभागाकडून मागविण्यांत येवुन कर्मचा-याचे गणवेषाकरिता किती कापड लागणार तसेच किती गणवेष शिलाई करावे लागतील ही माहिती घेवुन निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर केला आहे. युनियनने कापड नमुना नापसंत केला होता

मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख साहेब :- आता रेमंड कंपनीचे कापडाचे दर प्राप्त झाले आहेत.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- बिगारी, लिपिक झालेले आहेत त्यांची नांवे कमी केलेली आहेत का?

स्टोअर विभाग प्रमुख श्री. जाधव :- गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांनाच गणवेष देणेत येणार आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- मा. शासनाचे कर्मचा-यांना गणवेष देणे बाबतचे नियम आहेत का?

मा.उपायुक्त (कर)श्री. देशमुख साहेब :- महानगरपालिकेचे उपविधी नुसार गणवेष देणेत येतात.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- कर्मचारी गणवेष वापरत नाहीत. त्यामुळे मनपाचे कर्मचारी ओळखू येत नाहीत वॉर्डामध्ये कामासाठी आलेले कर्मचारी समजत नाहीत गणवेष न घालणारे कर्मचा-यांना दंड करावा.

मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख साहेब :- ड्रेस न घालणारे कर्मचा-यांवर खाते प्रमुखांचे शिफारशी नुसार कारवाई करण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- किती कर्मचा-यांना गणवेष देणेत येणार आहे.

मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख साहेब :- महानगरपालिकचे ड्रायव्हर, शिपाई , बिगारी असे एकूण १३७४ कर्मचा-यांना दोन गणवेष देणेत येणार आहेत.

मा.श्री.पवार बा.रे. :- गणवेष न घालता कामावर येणा-या कर्मचा-यांना दररोज रूपये १००/- प्रमाणे दंड करण्यांत यावा. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. गणवेषात नसणारे कर्मचा-याला दररोज रूपये १००/- प्रमाणे दंड करण्यांत यावा.

मा.सभापती साहेबः-ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा. गणवेषात कामावर न येणारे कर्मचा-यांना खाते प्रमुखाचे शिफारशी नुसार दररोज रूपये १००/- प्रमाणे दंड करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या कायम गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांकरिता गणवेष शिलाई करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दर धारक पंतगेज सुपरस्टीच टेलर्स अहमदनगर यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या कापडाचे परिमाणास शिलाई दरास व त्याकामी येणारे रक्कम रूपये ४,७६,०००/-(रूपये चार लाख शहात्तर हजार फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच गणवेषामध्ये कामावर न येणारे कर्मचा-यास खाते प्रमुखाचे शिफारशी नुसार दररोज रूपये १००/- (रूपये शंभर फक्त) या प्रमाणे दंड करण्यांत यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही/-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ६ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक - ६ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे कायम गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांकरिता गणवेष शिलाई करून वाटप करणेकरिता लागणारे कापड खरेदी करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास व रक्कम रूपये १६,२९,८४६/- चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग दि.१८/३/२०११

टिप्पणी- विषय- अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र पुरूष कर्मचा-यांकरीता गणवेष शिलाई करून वाटप करणेकामी लागणारे कापड खरेदीस व त्याकामी येणा-या रक्कम रूपये १६,२९,८४६/- फक्तच्या खर्चास मंजूरी मिळणे बाबत.

सादर,

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट की, मा.स्थायी समिती ठराव क्र.५० दि.२०/७/२०१० अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे गणवेषपात्र कायम पुरूष कर्मचारी यांना गणवेष वाटप करणे करीता गणवेष कापड खरेदी व गणवेष शिलाई करणेकामी जाहिर निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रू.१९,५९,५८७/- फक्तचे खर्चास मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र पुरूष कर्मचा-यांची नावासह यादी ते कार्यरत असणा-या विभागाकडून मागवून अंदाजे १३७४ पुरूष कर्मचा-यांकरीता गणवेष कापड खरेदी करणेकामी दै.सार्वमत दि.०७/१२/२०१० चे अंकात, महानगरपालिका वेबसाईट www. amc.gov.in वर व मनपा नोटीस बोर्डवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करून जाहिर निविदा मागविल्या असता मुदतीत-

१) मे. नॅशनल क्लॉथ स्टोअर्स, ठाणे
२) मे. ग्लोबल ट्रेडिंग कंपनी, ठाणे
३) मे. जनता फॅशन, मुंबई

अशा एकूण तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

निविदादराचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ ते ४ चे कापड दर मे. नॅशनल क्लॉथ स्टोअर्स, ठाणे यांचे स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी आहे. त्यांना दर निगोसिएशन करिता समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित राहून त्यांनी प्रशासकीय निविदा छानणी समिती समोर अ.क्र.१ मध्ये २% व अ.क्र. २ ते ४ मध्ये ३% दर कमी करून दिलेले आहेत. निविदाकार यांनी निगोसिएशन मध्ये कमी करून दिलेले दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.८ मध्ये नमुद केलेले आहेत. त्यांनी जकात माफीच्या प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

मा. शासन निर्णय क्र.१०८८ (२५१२) उद्योग- ६ दि.-२/१/९२ मधील परिशिष्ट ५ (अ) मधील तरतुदी नुसार-

१) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित
२) महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित
३) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित
४) टेक्सकॉम

५)महाटेक्स या सार्वजनिक उपक्रमाकडून/संस्थाकडून कापड खरेदी आरक्षित करण्यात आलेली आहे.त्यांना अहमदनगर महानगरपालिका कायम पुरूष कर्मचा-यां करिता गणवेषासाठी शासन दरकरारातील मंजूर दराचे व सुपेरिअर क्वॉलीटीचे खाकी व पांढरे सुटींग, खाकी गोल्डन सुटींग, पांढरे शटींग,जंगल ड्रेस सुटींग,नेव्ही ब्ल्यु सुटींग,स्काय ब्ल्यु शटींग, वुलन क्लॉथ,वुलन गणवेष करिता अस्तर कापड इ.कापडाच्या नमुन्यासह दरपत्रक दि.२४/०१/२०११पर्यत अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग कार्यालयात पाठविणेबाबत कळविले असता त्यांचेकडील प्राप्त झालेले दरपत्रकातील दर हे निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.९,१०व ११ मध्ये नमुद करण्यात आलेले आहेत.

निविदेतील निगोसिएशननंतर कमी करून दिलेल्या दराचे मे. नॅशनल क्लॉथ स्टोअर्स, ठाणे यांचे व शासन दरकरारातील मंजूर दराचे व सुपेरिअर क्वॉलीटीचे शासकीय संस्थाकडून प्राप्त झालेले गणवेष कापड नमुने पुरूष कर्मचारी प्रतिनिधी व कामगार युनियन प्रतिनिधी अहमदनगर महानगरपालिका यांना समक्ष दाखवून त्यांची पसंतीकामी मा. अध्यक्ष, अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन, अहमदनगर यांना जा.क्र. स्टोअर विभाग ३२४ दि.१४/०२/२०११ अन्वये कळविले असता त्यांनी दि.१५/०२/२०११ रोजी मा. उपायुक्त (सा.), मा.उपायुक्त (कर) यांचे समक्ष कर्मचारी प्रतिनिधी व युनियन प्रतिनिधींना निविदेसोबत प्राप्त झालेले व शासकीय दरपत्रकातील सर्व नमुने समक्ष पाहून शासकीय दरपत्रकासोबतचे नमुने नापसंत करण्यात आलेले असुन निविदेसोबतचे मे. नॅशनल क्लॉथ स्टोअर्स, ठाणे यांचे-

१) रेमंड कंपनीचे खाकी सुटींग कापड पन्हा ५८", पॉलीस्टर ६५% व व्हीसकोज ३५% ट्रॉवीन शेड ५०३०/००२८२४ नं.१९१

२) रेमंड कंपनीचे पांढरे सुटींग कापड पन्हा ५८", पॉलीस्टर ६५% व व्हीसकोज ३५% व शटींग कापड पन्हा ८९ सें.मी. पॉलीस्टर ७५% व कॉटन २५%

३) रेमंड कंपनीचे नेव्ही ब्ल्यु सुटींग कापड पन्हा ५८", पॉलीस्टर ६५% व व्हीसकोज ३५% व स्काय ब्ल्यु शटींग कापड पन्हा ८९ से.मी. पॉलीस्टर ७५% व कॉटन २५%

४) रेमंड कंपनीचे जंगल सुंटींग कापड पन्हा ५८"

५) वुलन कापड निळया रंगाचे पन्हा १३५ सें.मी.

६) अस्तर कापड निळसर रंगाचे पन्हा ८९ सें.मी.

वरीलप्रमाणे नमुने पसंत करण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे शिपाई कर्मचा-यांना शर्टींग कापडामध्ये पांढरा मॅनेला व सुटींग कापडमध्ये खाकी पॅन्ट, अग्निशमन विभागाकडील कर्मचा-यास शटींग कापडाचा स्काय ब्ल्यु रंगामधील मॅनेला व सुटींग कापडामध्ये नेव्ही ब्ल्यु रंगाची पॅन्ट तसेच या व्यतिरिक्त उर्वरित कर्मचा-यांना खाकी व पांढ-या रंगाच्या सुटींग कापडामध्ये मॅनेला व पॅन्ट याप्रमाणे गणवेष मिळावा याबाबत अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी जा.क्र. १०/श्रमिक /२०११ दि.०३/०३/२०११ अन्वये विनंती पत्र दिलेले आहे.

स्टोअर विभागाकडे स्टॉक मध्ये खाकी रंगाचे ब्लेंडेड सुटींग कापड पन्हा ५८" ३१८.३० मिटर, जंगल कापड-७.७० मिटर, ब्ल्यु रंगाचे कापड-१०.२० मिटर, स्काय ब्ल्यु रंगाचे कॉटन ब्लेंडेड शटींग कापड पन्हा ८९ सें.मी.-६२.१६ मिटर, वुलन कापड-निळे-३.२५ मिटर व अस्तर कापड २ मिटर शिल्लक आहे.

जा.क्र. स्टोअर विभाग- १७६८ दि.२०/८/२०१० अन्वये गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांची गणवेष वर्णन व नावासह माहिती मागवून प्राप्त झालेल्या माहिती प्रमाणे शिल्लक कापडा व्यतिरिक्त पसंत केलेल्या गणवेष नमुन्याच्या दरानुसार गणवेष कापड खरेदीस पुढील प्रमाणे खर्च येणार आहे.

| अ.क्र | पसंत नमुन्या प्रमाणे गणवेष कापड | परिणाम | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | रेमंड कंपनीचे खाकी सुटींग कापड पन्हा ५८", पॉलीस्टर ६५% व व्हीसकोज ३५% ट्रॉवीन शेड ५०३०/००२८२४ नं.१९१ | ५२०५ मिटर | रू.२३३=२० प्रती मिटर | १२,१३,८०६/- |
| २ | रेमंड कंपनीचे पांढरे सुटींग कापड पन्हा ५८", पॉलीस्टर ६५% व व्हीसकोज ३५% | ५९० मिटर | रू. २३३=२० प्रती मिटर | १,३७,५८८/- |
| ३ | रेमंड कंपनीचे पांढरे शर्टींग कापड पन्हा ८९ सें.मी.",पॉलीस्टर ७५% व कॉटन २५% | ८९७ मिटर | रू.१६०=०० प्रती मिटर | १,४३,५२०/- |
| ४ | रेमंड कंपनीचे नेव्ही ब्ल्यु सुटींग कापड पन्हा ५८", पॉलीस्टर ६५% व व्हीसकोज ३५% | २८० मिटर | रू.२३३=२० प्रती मिटर | ६५,२९६/- |
| ५ | रेमंड कंपनीचे स्काय ब्ल्यु शर्टींग कापड पन्हा ८९ सें.मी. पॉलीस्टर ७५% व कॉटन २५% | १११ मिटर | रू. १६०=०० प्रती मिटर | १७,७६०/- |
| ६ | रेमंड कंपनीचे जंगल सुंटींग कापड पन्हा ५८" | ४६.३० मिटर | रू.२३३=२० प्रती मिटर | १०,७९७=१५ |
| ७ | वुलन कापड निळया रंगाचे पन्हा १३५ सें.मी. | १०८.७५ मिटर | रू.३३९=५० प्रती मिटर | ३६,९२०=६५ |
| ८ | अस्तर कापड निळसर रंगाचे पन्हा ८९ सें.मी. | ६६ मिटर | रू.६३=०० प्रती मिटर | ४,१५८/- |
| **एकुण रक्कम रू. १६,२९,८४६=००** | | | | |

तरी मे. नॅशनल क्लॉथ स्टोअर्स, ठाणे यांनी निगोसिएशन नंतर कमी करून दिलेल्या दरामध्ये अहमदनगर महानगरपालिका कायम गणवेषपात्र अंदाजे १३७४ पुरूष कर्मचा-यांना प्रत्येकी दोन गणवेषा करीता लागणारे कापड खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रू.१६,२९,८४६=०० (अक्षरी रू. सोळा लाख एकोणतीस हजार आठशे शेहेचाळीस फक्त) चे खर्चास तसेच नामंजूर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजूरी मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर केलेला असून त्यावर मा.मुख्य लेखापरिक्षक तथा, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.उपायुक्तसाहेब (कर) व मा.आयुक्तसाहेब यांची अभिप्रायासह स्वाक्षरी आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये ं वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये ं झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कायम गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांना गणवेष वाटप करणेकामी लागणारे कापड खरेदी करण्यांस व त्याकामी येणारे खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार द. ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कायम गणवेष पात्र पुरूष कर्मचा-यांकरिता गणवेष शिलाई करून वाटप करणेकरिता लागणारे कापड खरेदी करणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक मे.नॅशनल क्लॉथ स्टोअर्स ,ठाणे यांनी निगोसिएशन नंतर कमी करून दिलेल्या कमीचे दरास व रक्कम रूपये १६,२९,८४६/-(रूपये सोळा लाख एकोणतीस हजार आठशे सेहेचाळीस फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही/-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ७ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक - ७ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे व सुतिकागृह दवाखाना येथे डॉ. श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून कंत्राटी करारानुसार दिनांक २७/१२/२०१० ते २६/६/२०११ अखेर मानधनावर केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्था. जा.क्र.१११ दि.८/३/२०११
प्रस्तावना-विषय- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील करारबध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

सादर,

मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह जा.क्र. ६९५ दिनांक २८/१२/१० अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "आस्थापना सुचीवर बालरोग तज्ञाचे पद मंजुर नाही. कै.बा.दे. दवाखाना व सुतिक गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता नेहमी भासते. १)डॉ.सुभाष फिरोदिया- एम.डी.२) डॉ.श्री.अनिरूध्द गिते-एम.डी.३)डॉ.श्री. सुचित तांबोळी- एम.बी.बी. एस.डी.सी.एच.पी.जी.डी.एम.एल.एस. यांची मा.स्थायी समिती ठराव क्र.५१ दिनांक २०/७/२०१० अन्वये दरमहा रू.१५००/- च्या मानधनावर दिनांक २६/६/२०१० ते २५/१२/२०१०अखेर सहा महिन्याकरिता नेमणुक केलेली होती. सदरच्या नेमणुकीची मुदत दिनांक २५/१२/२०१० रोजी संपत आहे.वरील बालरोग तज्ञ यांनी रूग्णांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी पुढील काळासाठी नेमणुक चालु ठेवणे बाबत विनंती अर्ज दिलेले आहेत. दवाखान्यात येणा-या गरीब व गरजु रूग्णांना त्याचा जास्तीत जास्त फायदा होतो. पर्यायाने पेशंटची गैरसोय होउ नये या करीता १) डॉ. सुभाष फिरोदिया २) डॉ.श्री. अनिरूध्द गिते ३) डॉ.श्री. सुचित तांबोळी या बालरोग तज्ञांची दिनांक २७/१२/२०१० ते दिनांक २६/६/२०११ अखेर सहा महिन्या करिता रू.१५००/- च्या मानधनावर नेमणुक होणे बाबत नमुद करून सुचित केलेले आहे.

तरी मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचे वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे १) डॉ. सुभाष फिरोदिया- एम.डी. २) डॉ.श्री.अनिरूध्द गिते- एम.डी. ३) डॉ.श्री. सुचित तांबोळी- एम.बी.बी. एस.डी.सी. एच.पी. जी.डी. एम.एल.एस. यांची जा.क्र. आस्था./ कंत्राटी करार नेमणुक ३९९२ दिनांक ८/३/२०११ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १५००/-(अक्षरी रूपये एक हजार पाचशे मात्र) या मानधनावर दिनांक२७/१२/२०१० ते दि.२६/६/२०११ या सहा महिन्याच्या कालावधी करीता केलेल्या करारबध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये ं वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये ं झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे बालरोग तज्ञांची मानधनावर केलेले नेमणूकीस अखेर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह दवाखाना येथे डॉ. श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून कंत्राटी करारानुसार दिनांक २७/१२/२०१० ते २६/६/२०११ अखेर मानधनावर केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयंवत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिति,<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ८ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक - ८ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदानगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील बोल्हेगांव दलीत वस्ती भागासाठी विद्या सागर बुक स्टॅाल ते श्री. कातोरे वस्ती दरम्यान १५० व २०० एम एम डी.आय. पाईप लाईन टाकणेचे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. शहर पाणी पुरवठा विभाग जा.क्र. १८५९ दि. २४/३/११

प्रस्तावना-विषय- प्रभाग क्र.१ बोल्हेगांव दलीत वस्ती भागासाठी विद्यासागर बुक स्टॅाल ते कातोरे वस्ती दरम्यान१५०व २००एमएम डी.आय.पाईप लाईन टाकणेचे कामाचे निविदा मंजूरीबाबत.

उपरोक्त विषयी विनंती रिपोर्ट सादर की, वरील कामाची जाहीर निविदा दैनिक वर्तमानापत्रात जाहिरात देवुन निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदा मा. उपायुक्त साहेब यांचे समोर दिनांक १९/१/२०११ रोजी उघडण्यात आली. सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १४,६४,८०१/- असुन सदर कामी कमी दराचे निविदाधारक **श्री. म्हस्के व्ही.के. अहमदनगर** यांचे दर निविदा रक्कमेपेक्षा ९९.८० % जादा दराचे असून त्यांना अंतीम देकार कळविणे बाबत इकडील पत्र जा.क्र. पा.पु. १५७८ दि.११/२/२०११ रोजी कळविले असता श्री. म्हस्के यांनी छाननी समिती समोर सदरचे काम सन २०१०-२०११ चे दरसुचीनुसार करण्यास तयार असले बाबत लेखी कळविले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक सन २००८-०९ नुसार करण्यात आले आहे. लघुत्तम निविदाधारक यांनी सदरचे काम सन २०१०-११ चे दरसुचीनुसार करणे बाबत लेखी सहमती दर्शविली आहे.

सन २०१०-२०११ च्या दरसुचीशी तुलना केल्यावर असे निदर्शनास आले की, सदर अंदाजपत्रकातील डी.आय.पाईप्सचे दर चालु दरसुचीनुसार ६७% वाढले आहेत. तसेच खोदाई माती कामाचे दर १३५% वाढले आहेत. व हार्ड मुरूम खोदाईचे दर १२०% वाढले आहेत. पाईप लेइंगचे दर १००% वाढले आहेत व रिफिलींगचे दर १५० % वाढले आहेत. रिमुव्हींगचे दर १३९% वाढलेले आहेत. या सर्व बाबींचा विचार केला असता सदर कामाची रक्कम चालू दरसूचीच्या बरोबरीची म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ६९.८४ % जादा दराचे आहेत.

त्यानुसार सादर रिपोर्ट मध्ये मा.मु.ले.प./मु.ले.अ., मा.उपायुक्त, मा.आयुक्त यांनी विषयांकित कामाचे सन २०१०-२०११ चे दर हे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ६९.८४% जादा आहेत. व सदरचे काम रक्कम रू.१०.०० लक्ष पेक्षा अधिक असल्याने मा. छाननी समितीने मा.स्थायी समितीकडे मंजूरीकरिता पाठविण्याची शिफारस केली आहे.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-बोल्हेगांव दलीत वस्ती भागासाठी डी.आय.पाईप लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.ढोणे मा.सु.:- सदर कामाची जाहिर निविदा कोणत्या वर्तमान पत्रात देण्यात आला होती. एकच निविदा प्राप्त झाली आहे का? महानगरपालिकेने यु.आय.डी.एस.एस.एम.टी.योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणेची योजना मंजूर करणेत आलेली आहे.

सदरचे काम चालू झाले त्यामध्ये संपूर्ण महानगरपालिकेतील विभागाचे काम अंतर्भुत आहे. विषयात नमुद केलेली पाईप लाईन टाकणेच्या कामाची वेगळी निविदा मंजूर करू नये.

मॅके.इंजि.श्री.निकम पी.जे.:- सदर कामाची निविदा दैनिक गांवकरी या वर्तमान पत्रामध्ये दिनांक २२/१२/२०१० रोजी प्रसिध्द करण्यांत आला होती. निविदा स्विकारणेची अंतिम तारीख ७/१/२०११ दुपारी २.०० वाजे पर्यत होती मुदती मध्ये चार निविदा प्राप्त झालेल्या असून कमीचे निविदा धारक श्री. म्हस्के यांची निविदा निविदा दरापेक्षा९९.८०%जादाची होती.वाटाघाटी अंती कमीचे निविदा दर धारक यांनी ६९.८४%जादा दराने काम करण्यांस संम्मती दिली असून त्याप्रमाणे कमीचे दर मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- सदर कामाची निविदा ही सन २००८-२००९ सालचे दरसुची प्रमाणे तयार केलेली आहे.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- हे दलित वस्तीतील काम असलेने त्यास मा.जिल्हाधिकारी साहेब यांची मंजूरी घ्यावी लागते मंजूरीकरिता प्रस्ताव सादर केले नंतर त्यास मंजूरी मिळते. मंजूरीकरिता प्रस्ताव सादर करतो त्या वेळचे दरसुची प्रमाणे कामाचे अंदाजपत्रक केलेले असते.

मा.श्री. पवार बा.रे. :- चालू दरसुची प्रमाणे निविदा रक्कमे पेक्षा ६९% जादाचे दरात काम करण्यांस सदर ठेकेदार तयार आहे का ?

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे.:- होय त्यांनी तसे लेखी दिलेले आहे.

मा.श्री. पवार द.ज. :- पाणी पुरवठयाची किरकोळ कामे होत नाही. शंभर दोनशे रूपये किंमतीचे साहित्याकरिता कामे अडून राहतात. एकदा पाणी पुरवठा विभागाची मिटींग घ्यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- पाईप लाईनची कामे व्यवस्थाीत होत नाहीत त्याकडे कुणी लक्ष देत नाही.

मा.सभापती साहेब :- मा.सदस्यांच्या प्रभागातील पाणीपुरवठ्या संबंधी किरकोळ कामे तातडीने करण्यांत यावीत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.पवार बा.रे.:-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा पाईपलाईनची कामे किरकोळ खर्चासाठी पेडींग ठेउ नयेत.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

<u>**ठराव :-**</u> अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील बोल्हेगांव दलीत वस्ती भागासाठी विद्या सागर बुक स्टॉल ते श्री.कातोरे वस्ती दरम्यान १५० व २०० एमएम डी.आय. पाईप लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे (लोएस्ट) निविदा दर धारक श्री.म्हस्के व्ही.के. , अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या चालू सन २०१०-२०११चे दरसूचीनुसार व अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ६९.८४% (एकोणसत्तर पुर्णांक चौ-याऐंशी शतांश टक्के ) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ९ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक - ९ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या जुन्या वाहनांचा लिलाव करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

मा.सादर,

अहमदनगर महानगरपालिकेच्या जुन्या वाहनांचा लिलाव करणेकामी सिलबंद दरपत्रके मागविण्यांत आली होती. एकुण ७ वाहने लिलावात असुन पैकी ४ वाहनांकरीता सिलबंद दरपत्रके प्राप्त झाली आहेत. मा.उपायुक्त (कर) यांच्या दालनात मुलेप / मुलेअ तसेच दरपत्रकधारक यांचे समक्ष दरपत्रके उघडण्यात येवुन तक्ता केला असता ४ वाहनांसाठी प्रत्येकी ३ दरपत्रके प्राप्त झालेली असुन ती खालीलप्रमाणे.

| अ.नं. | वाहन क्रमांक | सरकारी किंमत | दरपत्रकधारक | दरपत्रकातील किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | डि.एम.आर. २०४० | १,५०,०००/- | १) सय्यद अवेश मुश्ताक<br>२) शेख वसीम मेहबुद<br>३) शेख आसिफ उमर | १,५२,९००/-<br>१,५०,६००/-<br>१,५५,७८६/- |
| २ | एम.एच.१६ एन ११११ | ८०,०००/- | १) शेख इक्बाल तनवीर<br>२) शेख जावेद कासम<br>३) शेख समिर नजीर | ८२,०००/-<br>८३,०००/-<br>८१,०००/- |
| ३ | एम.एच.१६ एन २६४ | ६,००,०००/- | १) सय्यद अवेश मुश्ताक<br>२) शेख वसीम मेहबुद<br>३) शेख आसिफ उमर | ६,२१,०००/-<br>६,०२,०००/-<br>६,१०,०००/- |
| ४ | सेप्टीक टँक | १८,०००/- | १) सय्यद अवेश मुश्ताक<br>२) शेख वसीम मेहबुद<br>३) शेख आसिफ उमर | १८,५००/-<br>१९,१००/-<br>१८,२००/- |
| ५ | एम.एच. १६ एन १०१ | १,५०,०००/- | --- | --- |
| ६ | एम. एच. १६ ई २४२४ | ७५,०००/- | --- | --- |
| ७ | एम.एच. १६ एन २४ | ४०,०००/- | --- | --- |

वरील तक्त्याप्रमाणे ४ दरपत्रकधारकांनी निर्धारीत किंमतीपेक्षा जादा किंमती नमुद केलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे.

| अ.नं. | वाहन क्रमांक | सरकारी किंमत | दरपत्रकधारक | दरपत्रकातील किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | डि.एम.आर. २०४० | १,५०,०००/- | शेख आसिफ उमर | १,५५,७८६/- |
| २ | एम.एच.१६ एन ११११ | ८०,०००/- | शेख जावेद कासम | ८३,०००/- |
| ३ | एम.एच.१६ एन २६४ | ६,००,०००/- | सय्यद अवेश मुश्ताक | ६,२१,०००/- |
| ४ | सेप्टीक टँक | १८,०००/- | शेख वसीम मेहबुद | १९,१००/- |

उपरोक्त दरपत्रक धारकांनी नमुद केलेली रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येवुन वाहने ताब्यात देण्यास मंजुरी मिळावी तसेच उर्वरित ३ वाहनांच्या बाजारात चौकशी करता सरकारी किंमती जादा आल्याने पुन:श्च आर.टी.ओ. विभागास पत्र देवुन निर्धारीत किंमती काढुन घेवुन फेरलिलाव करणे योग्य वाटते.

येणेप्रमाणे रिपोर्ट ठेवला असता उच्चतम दरपत्रक धारकांच्या किंमतीनुसार वाहने लिलावात काढणे योग्य असुन मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करणेस तसेच उर्वरित ३ वाहनांकरीता फेरलिलावाची कार्यवाही करणेकामी मेकॅ.इंजि. यांनी शेरा दिलेला आहे. त्यानुसार मुलेप / मुलेअ /उपायुक्त यांची स्वाक्षरी घेउन्न मा.आयुक्त यांचेकडे प्रस्ताव ठेवला असता पुन्हा लिलाव काढणेकरीता स्थायी समितीच्या मान्यतेची आवश्यकता आहे का ? असा शेरा दिला असता प्राप्त दरपत्रके मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे निर्णयार्थ ठेवणे व उर्वरित वाहनांसाठी पुन्हा लिलाव करणेसाठी निविदा प्रसिध्द करण्यास मान्यतेस्तव मा.उपायुक्त यांनी सादर केल्याप्रमाणे मा.आयुक्त यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे लिलावाबाबतची पुढील कार्यवाही करणेकामी संपुर्ण प्रकरण मा.स्थायी समितीपुढे सादर.

येणे प्रमाणे मॅके.इंजि. यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे जुन्या वाहनांचा लिलाव करणेकामी आलेले निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. ढोणे मा. सु. :- वाहनाचे लिलावाबाबत जाहिरात कोणत्या वर्तमान पत्रात दिली होती.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- अहमदनगर महानगरपालिकेचे जुन्या वाहनांचा लिलाव करणेकामी सिलबंद दरपत्रके मागविण्यात आला होती. लिलावात असलेल्या एकूण ७ वाहनापैकी खालील ४ वाहनांचे सरकारी किंमती पेक्षा जादाचे दर प्राप्त झालेले आहेत ते असे

| **अ.नं.** | **वाहन क्रमांक** | **सरकारी किंमत** | **दरपत्रकधारक** | **दरपत्रकातील किंमत** |
|---|---|---|---|---|
| १ | डि.एम.आर. २०४० | १,५०,०००/- | शेख आसिफ उमर | १,५५,७८६/- |
| २ | एम.एच.१६ एन ११११ | ८०,०००/- | शेख जावेद कासम | ८३,०००/- |
| ३ | एम.एच.१६ एन २६४ | ६,००,०००/- | सय्यद अवेश मुश्ताक | ६,२१,०००/- |
| ४ | सेप्टीक टँक | १८,०००/- | शेख वसीम मेहबुद | १९,१००/- |

वरीलप्रमाणे निविदा धारकांनी नमुद केलेली रक्कम मनपा फंडात जमा करण्यांत येवुन वाहने त्याचे ताब्यात देण्यांस व उर्वरीत ३ वाहनांच्या बाजारात चौकशी करता सरकारी किंमती जादा असल्याने पुनःश्च आर.टी.ओ. विभागास पत्र देवुन निर्धारीत किंमती काढून ३ वाहनाचा फेर लिलाव करणेस मंजूरी मिळणे करिता प्रस्ताव सादर केला आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या जुन्या वाहनांचा लिलाव करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता तुलनात्मक दृष्टया जादाचे निविदा दर धारक (१) श्री. शेख आसिफ उमर (वाहन क्र डि.एम.आर. २०४०) रूपये १,५५,७८६/- [रूपये एक लाख पंचावन्न हजार सातशे शहाऐंशी फक्त](२) श्री.शेख जावेद कासम (वाहन क्र. एम.एच.१६एन ११११) रू.८३,०००/-[रूपये त्र्याऐंशी हजार फक्त] (३) श्री. सय्यद अवेश मुश्ताक (वाहन क्र. एम.एच. १६ एन २६४) रूपये ६,२१,०००/- [रूपये सहा लाख एकवीस हजार फक्त] (४) श्री. शेख वसीम मेहबुद (सेप्टीक टँक) रूपये १९,१००/-[रूपये एकोणवीस हजार शंभर फक्त] यांनी सरकारी किंमती पेक्षा जादाचे दिलेल्या किंमतीस लिलाव त्यांचे नांवे करण्यांस व उर्वरित तीन वाहनांबाबत आर.टी.ओ. विभागास पत्र देवुन निर्धारीत किंमत काढून तीन वाहनांचा फेरलिलाव करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती,

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १० बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक - १० बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे डॉ.एस.टी. महाले, मंगल कार्यालय भाडे तत्वावर चालविण्यांस मिळणे बाबत शिव वरद पुरूष बचत गट व इतर यांचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका शहर अभियंता दि.२/४/२०११

प्रस्तावना-विषय- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचे डॉ.एस.टी. महाले मंगल कार्यालय भाडेतत्वावर चालविणेस देणेबाबत.

संदर्भ :- १) शिव वरद पुरूष बचत गट यांचा दि.०८/०२/२०११ चा अर्ज.
२)गौरी शंकर मित्र मंडळ (ट्रस्ट), जयभवानी चौक, अ.नगर यांचा दि.२२/२/११ चा अर्ज
३) शिवशंकर मित्र मंडळ (ट्रस्ट) रंगारगल्ली ,आनंदीबाजार ,अ.नगर

अहमदनगर महानगरपालिकेचे रंगारगल्ली येथील डॉ. महाले, मंगल कार्यालय असुन सदरचे कार्यालयाची बुकींग महानगरपालिके माहिती सुविधा केंद्रा मध्ये होते. सदर कार्यालय शहराच्या मध्यवस्तीत असुन सदर ठिकाणी लग्न समारंभाकरीता व इतर कार्यक्रमाकरीता देण्यात येते. सदर कार्यालय हे महानगरपालिके मार्फत चालविण्यात येत आहे व त्याचे सद्यस्थितीतील एक दिवसाचे भाडे खालील प्रमाणे आहे.

भाडे :- १४८९/-
डिपॉझीट :- १३५०/-

नागरिकाकडून भाडे व डिपॉझीट वसुल केले जाते व समारंभ पार पडल्यानंतर कार्यालयाची कोणतीही नुकसान न झाल्यास तसा वॉचमनचा रिपोर्ट आल्यानंतर भरलेले सि डिपॉझीट परत दिले जाते.

तसेच महानगरपालिकेस सदर मंगल कार्यालयापासुन वार्षिक उत्पन्न खालील प्रमाणे

| अ.नं. | सन | मिळालेले उत्पन्न |
|---|---|---|
| १ | २००७-२००८ | १,०६,६५०/- |
| २ | २००८-२००९ | १,२०,१५०/- |
| ३ | २००९-२०१० | १,१०,७००/- |
| | एकुण | ३,७५,५००/- |

महानगरपालिकेस सदर कार्यालयाकरीता मासिक खालील प्रमाणे खर्च येत आहे.

१. वॉचमन, रात्रपाळी व दिवसपाळी :- २८,०००/- प्रति महिना
२. लाईट बील मासिक :- २८५३.३५ प्रती महिना
३. सफाई चार्जेस :- १४,०००/- प्रती महिना

अर्जदार शिववरद पुरूष गट, गौरी शंकर मित्र मंडळ (ट्रस्ट) व शिवशंकर मित्र मंडळ (ट्रस्ट) यांनी संदर्भिय पत्रान्वये महानगरपालिकेचे डॉ. महाले , मंगल कार्यालय नाममात्र दराचे चालविण्यास मिळणेबाबत अर्ज दिला आहे.

वरीलपैकी शिववरद पुरूष बचत गट, वगळता इतर दोन्ही संस्थांनी अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. शिववरद पुरूष बचत गट, अ.नगर यांनी त्यांचे अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडले आहेत.

१. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये संस्थेचा नोंदणीचा दाखला
२. बचत गटाचे पासबुकची छायांकित प्रत
३. पॅन कार्डची छायांकित प्रत
४. टॅक्स क्लीअरन्सची छायांकित प्रत
५. प्रोफेशन टॅक्स करीता दिलेले अफिडीव्हेट व चलन
६. जिल्हा उद्योग केंद्र अहमदनगर यांचेकडे नोंदणी केलेले सर्टीफिकेट

सदर मंगल कार्यालय शिववरद पुरूष बचत गट यांनी चालविण्यांस देणे बाबत मागणी केली आहे. कार्यालय नामपात्र दरात चालविण्यास देण्या करीता महानगरपालिकेच्या कायदे सल्लागाराचे मत घेतल्यानंतर सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे चर्चे करीता पाठविणे योग्य वाटते यावर पुनश्च रिपोर्ट फेर सादर की मंगल कार्यालये BOT तत्वावर चालविणेस देणे बाबत महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रमांक ४९ दिनांक २२/६/२०१० अन्वये भाग्योदय मंगल कार्यालय केडगांव सोडुन इतर मंगल कार्यालये BOT तत्वावर देण्यास हि सभा मान्यता देत आहे खर्च मंजुर नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असा ठराव पारित झालेला आहे. या नुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्ती तयार करून त्या प्रमाणे कार्यवाही करणे योग्य वाटते.

यावर मा. आयुक्त सो. यांचा अभिप्राय की १) महानगरपालिकेस मागील तीन वर्षाचे प्राप्त सरासरी भाडे महानगरपालिकेस मिळत असल्यास संस्था, मानन्यास तयार असल्यास २) वीज पाणी, व चौकीदार इ. संपुर्ण मेन्टनन्स संस्था करण्यास तयार असल्यास त्यानुसार मा. स्थायी समिती ने निर्णय घ्यावा असा अभिप्राय दिला आहे.

सदर बाबत निर्णयास्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेबः- महानगरपालिकेचे डॉ.एस.टी. महाले, मंगल कार्यालय भाडे तत्वावर चालविण्यांस मिळणे बाबत शिववरद पुरूष बचत गट व इतर यांचे अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्टावर निर्णय घेणेबाबत प्रस्ताव आहे. ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सौ.ढोणे मा.सु.:- सदर कार्यालय चालविण्यांस दिले नंतर ते नागरिकांना लग्न सभारंभ, मुंज इत्यादी कार्यक्रमासाठी सदर संस्थेने देणे आवश्यक आहे ते त्याप्रमाणे कार्यक्रमासाठी देतील का?

मा.श्री. पवार बा.रे. :- सदर संस्था भाडे किती ठेवणार आहे.

मा.सौ.ढोणे मा.सु. :- सदरचे कार्यालय चालविण्यांस देणे बाबत अटी शर्ती काय आहेत.

उपशहर अभियंता श्री. सातपुते :- सदर मंगल कार्यालय चालविण्यास कसे देणार ते ठरविलेले नाही अटी शर्ती ठरविणे आहेत ते भाडे तत्वावर देणे किंवा कसे याबाबत मंजूरी मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु.:-जागेचे भाडे कमीत कमी पांच लाख येणे आवश्यक आहे. जागा भरवस्तीत आहे.

मा.सभापती साहेब :- अर्जदार शिववरद पुरूष गट यांना सदर कार्यालयाचे मागील तीन वर्षाचे सरासरी भाडे इतके रकमेमध्ये रू.१०,०००/-वाढ करून व त्याप्रमाणे दरवर्षी भाडे वाढ करून सदर मंगल कार्यालय पांच वर्षाकरिता भाडे तत्वावर चालविण्यांस देणे बाबत ठरवावे.

मा.श्री.पवार बा.रे.:- मा.महासभे मध्ये भाग्योदय मंगल कार्यालय सोडून इतर मंगल कार्यालये B.O.T. तत्वावर चालविण्यांस देण्यांस मा.महासभेने मंजूरी दिलेली असल्याने अर्जदार यांना अटी शर्ती ठरवून मंगल कार्यालय भाडे तत्वावर चालविण्यंस देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:-ऑफिस रिपोर्टानुसार अटी शर्ती ठरवून भाडे तत्वावर महाले मंगल कार्यालय चालविण्यांस देणेस मंजूरी देण्यांत यावी.वीज,पाणी व चौकीदार इत्यादी संपूर्ण मेन्टेनन्स संस्थेने करावा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेस सदर कार्यालयाचे गेल्या तीन वर्षामध्ये मिळालेले सरासरी वार्षिक उत्पन्न रूपये १,२५,०००/- अधिक रूपये १०,०००/- प्रमाणे वाढ करून म्हणजेच रूपये १,३५,०००/- वार्षिक भाडे घेवुन अर्जदार यांना सदर मंगल कार्यालय चालविण्यांस देण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

वार्षिक भाडे मध्ये दरवर्षी रूपये १०,०००/- याप्रमाणे वाढ करून पांच वर्षाकरिता अटी शर्ती ठरवून अर्जदार यांना सदर मंगल कार्यालय भाडे तत्वावर चालविण्यांस देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. तसेच सदर कार्यालयाचे वीज, पाणी व चौकीदार इत्यादी संपूर्ण मॅन्टेनन्स चा खर्च सदर संस्थेने करावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे डॉ.एस.टी. महाले, मंगल कार्यालय अर्जदार शिववरद पुरूष बचत गट यांना रूपये १,३५,०००/-(रूपये एक लाख पस्तीस हजार फक्त) वार्षिक भाडे घेवुन पांच वर्षासाठी भाडे तत्वावर चालविण्यांस देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

अर्जदार यांचेकडून वार्षिक भाडे मध्ये दरवर्षी रूपये १०,०००/-(रूपये दहा हजार) याप्रमाणे वाढ करण्यांस अटी शर्ती ठरवून अर्जदार यांना सदर मंगल कार्यालय चालविण्यांस देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच सदर कार्यालयाचे वीज, पाणी व चौकीदार इत्यादी संपूर्ण मेन्टेनन्सचा खर्च सदर संस्थेने करावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करावी

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ११ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक - ११ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे राणी लक्ष्मीबाई चौक भूषणनगर येथील महिला जीम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणेकामी अटी शर्ती व भाडे निश्‍चितीस व करारनाम्याचे मसुदयास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका क्रीडा विभाग

विषय- राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर केडगाव येथील मनपाची महिला जिम खाजगी तत्वावर चालविण्यास देणेबाबत.

प्रस्तावना-

उपरोक्त विषयाबाबत मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.५६ दि.३०/८/२०१० अन्वये मागवलेल्या माहितीसह प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे पाठविण्यांस सादर केला असता, सर्व कागदपत्रे तपासुन पात्र संस्थेसोबत वाटाघाटी करण्याचे आदेश झाले होते.

तथापी सदरची जिम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणेबाबत करावयाचा करारनामा मुसदा, अटी, शर्ती व भाडे निश्‍चितीस मा.स्थायी समितीची मंजुरी मिळाली नसल्यामुळे, सदर बाबींच्या मंजुरीस्तव प्रस्ताव पुनश्च मा. स्थायी समिती पुढे पाठविण्यास सादर केला असता त्यावर प्रस्तावीत महिला जिम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणे बाबतच्या अटी, शर्ती व भाडे निश्‍चिती तसेच करारनामा मसुदा इ. बाबींच्या मंजुरीसाठी विषय मा.स्थायी समिती पुढे ठेवण्याचे प्रशासकीय आदेश झालेले आहेत.

त्यानुसार सदर महिला जिम खाजगी करणाच्या तत्वावर चालविण्यांस द्यावयाची झाल्यास त्यास मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक असल्याने सदर प्रकरण मा.स्थायी समितीपुढे पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे क्रीडा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर, केडगांव येथील महिला जीम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणेकामी अटी शर्ती व भाडे निश्‍चिती तसेच करारनामाचे मसुदास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- सदर जीमचे २००८ मध्ये बांधकाम झालेले आहे. सदर जीम चालविणेकरीता मागणी आलेली आहे का ?

क्रीडा विभाग श्री. मिसाळ :- १] कार्तिका महिला बचत गट २] स्वामी समर्थ महिला बचत गट ३] हिकरणी महिला बचत गट यांनी जीम चालविणेस मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- त्यांची मागणी काय आहे.

क्रीडा विभाग श्री.मिसाळः- स्वामी समर्थ महिला बचत गट व कार्तिक महिला बचत गट यांनी ना- नफा, ता-तोटा तत्वावर चालविणेस मिळणे बाबतचा अर्ज आहे. तसेच हिकरणी महिला बचत गट यांनी नाममात्र भाडे व अनामत रक्कम भरून जीम चालविणेस मिळणे बाबत अर्ज केलेला आहे.

मा.श्री.पवार द.ज.:-सदरची जीम महानगरपालिकेने मुलभुत सुविधा (पाणी व वीज)उपलब्ध केल्यानंतर वरील पैकी हिकरणी महिला बचत गटास महानगरपालिकेच्या सर्व अटी व शर्तीस अधिन राहून अनामत रक्कम रूपये १०,०००/- व दरमहा रू.५००/- मात्र भाडे याप्रमाणे देणेस मंजुरी देण्यांत यावी.

मा.सौ. ढोणे मा. सु. :- जीम खाजगी तत्वावर चालविण्यांस देउ नये.

मा.उपायुक्त (कर) श्री. देशमुख साहेब :- आपले कडेस जीम चालविणेसाठी शिक्षित स्टाफ नाही.

मा.श्री. पवार बा.रे.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टावर सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे राणी लक्ष्मीबाई चौक भूषणनगर येथील महिला जीम खाजगी तत्वावर महानगरपालिकेने मुलभुत सुविधा (पाणी व वीज) उपलब्ध करून हिकरणी महिला बचत गटास दरमहा रू.५००/-(रूपये पाचशे) भाडे व अनामत रक्कम रूपये १०,०००/-(रूपये दहा हजार फक्त) घेवुन पाच वर्षाकरीता भाडे तत्वावर चालविण्यांस मंजुरी देण्यात येत आहे.

अर्जदार यांचेकडून महानगरपालिकेच्या सर्व अटी व शर्ती ठरवून तसेच वीज, पाणी , चौकीदार व मेन्टेनन्सचा खर्च सदर संस्थेने करावा. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयंवत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १२ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक- १२ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभाग / घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता शहरात निर्माण होणा-या कच-याचे मनपाचे वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणे करिता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे कामी मागविण्यांत आलेल्या प्राप्त निविदा मधील द्वितीय लघुत्तम निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा.आरोग्य विभाग/घनकचरा विभाग जा.क्र.४४१दि.३१/३/११

विषय- अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभाग / घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता शहरात निर्माण होणा-या कच-याचे म.न.पा.च्या वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणेकरीता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणेबाबत प्राप्त निविदेतील द्वितीय उघुत्तम निविदा दरास मा.स्थायी समितीची मंजुरी मिळण्याबाबत.

संदर्भ :- मा.आयुक्त साहेब यांच्या दि.२५/३/२०११ च्या मंजुरीनुसार

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते, घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे बाबत एक वर्षाकरीता देय दराची सिलबंद फेर निविदा दि.२१/१२/२०१० ते दि.२३/१२/२०१० दरम्यान मागविण्यात आली होती.

वरील निविदा दि.२४/१२/२०१० रोजी उपायुक्त (कर) यांचे दालनात निविदा (तांत्रिक लिफाफा क्र.१) उघडण्यात आली. तसेच दरपत्रके दि.३१/१२/२०१० रोजी उघडण्यात आले. त्या वेळेस लोकसेवा सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था औरंगाबाद या संस्थेचे दर तुलनात्मक दृष्टया कमी असल्याचे दिसुन आल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र.९८ दि.११/३/२०११ नुसार दि.१४/३/२०११ रोजी रितसर करारनामा पुर्ण करून सदर संस्थेस दि.१४/३/२०११ रोजी कार्यारंभ आदेश देवुन दि.१५/३/२०११ रोजी पासून सदर संस्थेने कामाला सुरूवात केली परंतु तद्नंतर सदर संस्थेचे काम समाधान कारक नसल्या व वाहन चालक पुरविण्यास असमर्थ ठरल्यामुळे सदर संस्थेने सदर ठेकाचे रद्द करणेबाबत पत्र दिल्यानंतर निविदा प्रक्रियेत प्राप्त निविदे मध्ये द्वितीय लघुत्तम निविदा धारक विशाल एंन्टर प्रायजेस, पुणे यांच्या प्रतिनिधीस बोलवुन मा.स्थायी समिती सभेने मंजुर दर रक्कम रू.४७००/- प्रति वाहन चालक प्रति माह दराने काम करणेबाबत विचारणा केल्यावर सदर संस्थेने वरील दराने काम करण्यास तक्रार दिला असुन त्यांनी निविदे मध्ये दाखल दर रक्कम रू.५१८०/- प्रति वाहन चालक प्रति माह दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे. कचरा संकलन व वाहतुक हि बाब अत्यावश्यक सेवेतील असल्याने मा. आयुक्त साहेब यांनी खालील नमुद केलेल्या दरास एक महिन्या करीता मंजुरी देण्यात आली आहे.

| अ.नं. | कामाचा तपशील | निविदाकाराने निविदे मध्ये नमुद केलेले दर (रक्कम रू.) |
|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिका आरोग्यविभाग/ घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता शहरात निर्माण होणा-या कच-याचे म.न.पा.च्या वाहनांमार्फत संकलन व वाहतुक करणेकरीता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणेबाबत | प्रति वाहन चालक प्रति महा दर रू.५१८०/- (पाच हजार एकशे ऐंशी रू.) |

वरील प्रमाणे प्राप्त दर पत्रकानुसार व सध्या स्थितीनुसार आरोग्य दृष्टया तसेच प्राप्त निविदे मध्ये द्वितीय लघुत्तम निविदा धारक विशाल एंन्टर प्रायजेस, पुणे या संस्थेचे दर रक्कम रू.५१८०/- प्रति वाहन चालक प्रति माह या दरास पुढील एक वर्षाकरीता अंतीम मंजुरीसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव नजीक स्थायी समिती सभेमध्ये विषय घेण्यात यावा ही विनंती.

येणेप्रमाणे उपआरोग्य अधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे आरोग्य विभाग / घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता शहरात निर्माण होणा-या कच-याचे म.न.पा.चे वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणे करिता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा मधील द्वितीय लघुत्तम निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. ढोणे मा.सु. :- अटी शर्ती सांगाव्यात.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- सदर कामाचे मंजूर ठेकेदार वाहन चालक पुरवित नाही का?

उपवैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.श्री. पैठणकर :- सदर अभिकर्ता संस्थेचे काम समाधान कारक नाही व वाहन चालक पुरविण्यांस ते असमर्थ ठरल्यामुळे सदर संस्थेने ठेका रद्द करणेबाबत पत्र दिलेनंतर द्वितीय लघुत्तम निविदा धारक विशाल एन्टरप्रायझेस , पुणे यांनी विचारणा केले नंतर रूपये ५,१८०/- प्रतिवाहन चालक प्रतिमाह या दराने काम करण्यांस त्यांनी संम्मती दर्शविली असून मा.आयुक्त साहेब यांनी एक महिन्याकरिता मंजूरी दिलेली आहे. त्याच दरास पुढिल एक वर्षाकरिता अंतिम मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे.. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभाग / घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता शहरात निर्माण होणा-या कच-याचे मनपाचे वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणे करिता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे कामी मागविण्यांत आलेल्या प्राप्त निविदा मधील द्वितीय लघुत्तम निविदा धारक विशाल एंन्टर प्रायजेस, पुणे या संस्थेचे दर रक्कम रू.५१८०/- (रूपये पांच हजार एकशे ऐंशी फक्त) प्रति वाहन चालक प्रति माह या दरास पुढील एक वर्षाकरीता अंतीम मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- १३ बुधवार दिनांक २७/४/२०११

ठराव क्रमांक- १३ बुधवार दिनांक २७/४/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे १२ व्या वित्त आयोगातील निधी मधून काटवन खंडोबा रस्त्यावरील पुल व सारसनगर रस्त्यावरील भिंगार नाल्यावरील पुलाचे कामासाठी रूपये २१ लक्ष इतका निधी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील पत्रानुसार त्यांचेकडेस हस्तांतरीत करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. सार्वजनिक बांधकाम विभाग जा.क्र. ३२ दि. १८/४/२०११

प्रस्तावना-विषय- काटवन खंडोबा रस्त्यावरील पुल व सारसनगर रस्त्यावरील भिंगारनाल्यावरील पुलाबाबत.

संदर्भ :- १) इकडील पत्र जा.क्र. ८५८ दि.८/७/२०१०

२) कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग यांचे पत्र जा.क्र. लेखा/अनामत/७३६०/२०१० दि.१५/९/२०१० व पत्र जा.क्र. लेखा/अनामत /७२५३/२०१० दि.८/९/२०१०

३) मा.आयुक्त साहेब यांचे दि.११/४/२०११ रोजीची मंजूरी.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना संदर्भिय पत्र क्र.१ नुसार २१.०० लक्ष या अतिरिक्त निधी मागणी बाबतचा सविस्तर तपशिल सांगितलेला होता. त्यानुसार संदर्भिय पत्र क्र.२ व ३ नुसार खालीलप्रमाणे माहिती कळविलेली आहे.

१) काटवन खंडोबा सीना नदी पुल :- तत्कालीन सुचनेप्रमाणे मुळ जागेच्या ऐवजी अस्तित्वातील फरशी पुलाच्या जागेवर नविन पुल बांधण्याची सांगितल्यामुळे राफ्ट फाउंडेशन ऐवजी ओपन फाउंडेशन करावे लागेल व त्याची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १] ठेकेदाराची मागील देयकातून रोखुन ठेवलेली रक्कम | :- १०.७४ लक्ष |
| २] अतिरिक्त बाबीसहित कामाचे देयक | :- ३.४० लक्ष |
| ३] सेटेंज चार्जेस | :- ०.७६ लक्ष |

-----------------------

**एकूण १५.०० लक्ष**

२) सारसनगर भिंगारनाल्यावरील पुल :- निविदेतील संकल्प चित्रानुसार जुन्या पुलाच्या ऐवजी नविन ठिकाणी पुलाचे काम सुरू करण्याचे तत्कालीन सुचनांप्रमाणे काम केले व पुर्वीच्या संरेखेत बदल केल्यामुळे सर्व परिणामांमध्ये वाढ झाले तसेच सदर निविदेत भाववाढ कलम देय असलेने खालील तपशिलाप्रमाणे मागणी केलेली आहे.

| | |
|---|---|
| १] पुर्वीच्या देयकातील रोखून ठेवलेली रक्कम | :- २.५० लक्ष |
| २] भाववाढ ( प्राईस एक्सलेशन) | :- १.७५ लक्ष |
| ३] शिल्लक पोहोच मार्गाचे काम | :- १.०० लक्ष |
| ४] ठेकेदाराची वाढीव दराचे अंशदानाची फी | :- ०.७५ लक्ष |

-----------------------

**एकूण ६.०० लक्ष**

वरीलप्रमाणे १५.००+६.००=**२१.०० लक्ष** असा अतिरिक्त निधी काम पुर्ण करणेसाठी संदर्भिय पत्रान्वये मागणी केली आहे. यापुर्वी दोनही कामे मा. शासनाच्या १२ व्या वित्त आयोगामधून खर्च केलेली आहे. तसेच महानगरपालिका निधीमध्ये देखील २१.०० लक्ष निधी वर्ग करणेकरिता तरतुद ऑक्टों. २०१० पुर्वी उपलब्ध होवु शकत नाही व मा. शासनाच्या १२ व्या वित्त आयोगाचे अहमदनगर महानगरपालिकेसाठी सुमारे ९१.०० लक्ष रूपये इतका निधी आहे असे समजते. त्याकारणे सारसनगर नदीवरील पुलासाठी ६.०० लक्ष व काटवन खंडोबा रस्त्यावरील सिना नदीवरील पुलासाठी रू.१५.०० लक्ष असे मिळून एकूण २१.०० लक्ष इतका निधी मा. शासनाच्या १२ व्या वित्त आयोगातील निधीमधुन देणेस्तव व रू.२१.०० लक्ष इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे हस्तांतरीत करणेसाठी अर्थ विभागास आदेश होणेसाठी मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- काटवन खंडोबा व सारसनगर येथील पुलांचे कामासाठीचा निधी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडील पत्रानुसार त्याचेकडेस वर्ग करण्यास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे. प्रस्तावाची माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री.मगर एन.बी. :- काटवन खंडोबा रस्त्यावरील पुल व सारसनगर रस्त्यावरील भिंगार नाल्यावरील पुलाबाबत सार्व.बांधकाम विभाग यांनी दिनांक ८/७/२०१०चे पत्रान्वये रूपये २१लक्ष निधी मागणी बाबत पत्र दिले आहे. सारसनगर पुलासाठी सहा लाख व सिना नदी वरील पुलासाठी रूपये १५लाख मा.शासनाचे १२व्या वित्त आयोगाचे रूपये ९१ लाखाचे म.न.पा. निधीमधुन रू.२१ लाख निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तातरीत करणेसाठी मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर केला आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- खर्च कशामुळे वाढला.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- राफ्ट फौन्डेशन ऐवजी ओपन फौन्डेशन केले एक्ट्रा आयटेम मुळे खर्चात फरक पडला आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- बारावे वित्त आयोगाचे निधीमधून या कामासाठी निधी वापरता येईल का ?

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- होय

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**<u>ठराव:-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे १२व्या वित्त आयोगातील निधी मधून काटवन खंडोबा रस्त्यावरील पुल व सारसनगर रस्त्यावरील भिंगार नाल्यावरील पुलाचे कामासाठी रूपये २१,००,०००/-(रूपये एकवीस लाख) इतका निधी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील पत्रानुसार त्यांचेकडेस हस्तांतरीत करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका